## BeingWithYou HELP Foundation

(Hand of Empathy, Love & Protection)

NGO Working for Patient's Relatives and Senior Citizens

**Address: Flat No. 403, SP Sai Virat CHS., S.No.7/2, Suncity Rd., Wadgaon BK, Anand Nagar, Pune 411051**

SECTION 8 CO. REG. NO. **U85300PN2020NPL189239** | PAN NO. **AAICB8682L** | TAN NO. **PNEB14589B**


"छोटे कुटुंब सुखी कुटुंब" म्हणून आजकाल छोट्या कुटुंबाला प्राधान्य दिले जात आहे. आमंचही पंचकोनी कुटुंब होत. सासूबाई, सासरे, माझे मिस्टर, मी आणि आमची कन्या. त्यामुळे कुटुंबातील सदस्यांची संख्याही कमी असते. प्रत्येक गोष्टीचे फायदे तोटे दोन्ही असतात. ते आपण स्वीकारत असतो. घरात सगळे काही सुरळीत चालू असते तेंव्हा "छोटे कुटुंब सुखी कुटुंब" वाटत असते परंतू घरातील एखाद्या व्यक्तिच्या आजारपणात जेंव्हा हॉस्पिटल च्या वाऱ्या सुरू होतात तेंव्हा मात्र मदतीचे हात कमी पडू लागतात, आणि अशा वेळी कोणीतरी मदतीला असावे असे वाटते.

माझ्याही बाबतीत तेच घडले मिस्टरांना सख्खे भावंड कुणी नसल्यामुळे सासूबाई आणि सासऱ्यांच्या आजारपणात आमची दोघांची तारेवरची कसरत सुरू असे. मुलगी लहान होती तिची शाळा, अभ्यास, मिस्टरांचे ऑफिस आणि हॉस्पिटल या सगळ्यात मी जाई पर्यन्त पेशंट जवळ एखाद तासभर कुणी नसे, त्यावेळी कोणाची तरी मदत मिळावी असे फार वाटे, पण नाही मिळाली. तसेच मुंबईत माझी आई चालता येत नसल्याने अंथरूणाला खिळून होती, ती बहिणी कडे रहात होती आम्ही अधून मधून मुंबईला जात असू पण दहा पंधरा दिवसा पेक्षा जास्त राहणे शक्य नव्हते त्यामुळे बरेचदा ऑफिसला जाताना तिला एकट ठेऊन कुलूप लावून जावे लागे त्यावेळी ही कोणाच्या तरी मदतीची गरज होती पण मिळाली नव्हती. पुढे सासू-सासरे आणि आई यांच्या निधना नंतर मनात सतत विचार सुरू होते अशी सेवा लोकाना मिळणे गरजेचे आहे ती आपण सुरू करावी.

माझी आई डिसेंबर २०१८ ला गेली. त्यानंतर मात्र मी निर्णय घेतला माझी कल्पना माझे मिस्टर श्री. नितिन ठाकूरदेसाई, उपेंद्र पेंडसे, श्रीरंग पाळंदे, आणि अस्मिता पटवे यांच्या समोर मांडली त्यांनाही आवडली. कामाचे स्वरूप काय असावे नियम काय असावेत सेवा देत असताना काय काळजी घ्यावी यावर चर्चा सुरू असताना. एक दिवस सौ. पाटील यांचा फोन आला त्यांचे मिस्टर पुण्याच्या सह्याद्री हॉस्पिटल मध्ये ॲडमिट होते

आणि त्यांना दुसऱ्या दिवशी सकाळी सहा ते दहा या वेळेत सेवा हवी होती. अजून लोकांपर्यन्त आम्ही पोहचलो नव्हतो तरीही मागणी आली होती. त्या वेळी आम्ही पाच जणच होतो पण आलेली सेवा मागणी नाकारायची नाही पूर्ण कारायचीच असे म्हणून श्री. नितिन ठाकूरदेसाई यांनी ती सेवा पूर्ण केली. अशा रितीने २६ जानेवरी २०१९ रोजी आमच्या कामाची मुहूर्तमेढ रोवली गेली. जानेवारी २०१९ पासून आत्ता पर्यन्त आम्ही ३००० तासांची विनामूल्य सेवा घरी किंवा हॉस्पिटल मध्ये जरूरी प्रमाणे दिली आहे.

घरातील कोणी आजारी असले म्हणजे पेशंटच्या जवळच्या व्यक्तीची त्यात गृहीणींची फार धावपळ होत असते. आजच्या काळात नवरा बायको दोघांनी नोकरी करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. आजारपण वाढले तर जास्त सुट्ट्या मिळणे ही शक्य नसते आणि अशावेळी मदतीची अत्यंत गरज भासत असते. नातेवाईक सुद्धा सुरवातीला मदतीला येतात पण आजारपण लांबले की त्यांनाही शक्य होत नाही. नर्सिंग ब्यूरो मधून मदतनीस मिळतात पण ते एक दोन तासांसाठी येत नाहीत आणि आलेतरी त्यांना पूर्ण पैसे द्यावे लागतात आणि हे सगळ्यांना शक्य नसते अशा वेळी आजारी व्यक्तिच्या जवळच्या नातेवाईकांना मानसिक आधाराची गरज असते त्याच बरोबर आजारी व्यक्ति जवळ थांबण्यासाठी कोणीतरी हवे असते. अशा वेळी मिळालेला मदतीचा हात दिलासा देऊन जातो. तसेच ज्यांची मूलं परदेशी आहेत असे जेष्ठ पालक, एकटे राहणारे जेष्ठ यांना मदतीची गरज भासत असते. हा मदतीचा हात **BeingwithYou Help Foundation** (**Hand of Empathy Love & Protection)** ने पुढे केला आहे. आमच्या संस्थे तर्फे रुग्णांचे नातेवाईक आणि जेष्ठ नागरिकांना **तीन तासांची विनामूल्य** सेवा दिली जाते. नातेवाईकांच्या अनुपस्थितीत आमचे स्वयंसेवक रुग्णांची, जेष्ठांची सोबत करतात. ही सेवा हॉस्पिटल मध्ये किंवा घरी गरजे नुसार दिली जाते.

**आमची ठळक वैशिष्ट्ये**

१. **रुग्णांच्या /जेष्ठां जवळच्या नातेवाईकांच्या अनुपस्थितीत आमचे स्वयंसेवक तीन तास रुग्णाची /जेष्ठांची घरी किंवा हॉस्पिटल मध्ये सोबत करतात. ही सेवा पूर्णपणे विनामूल्य आहे.**

२. **रुग्णांना हॉस्पिटलमध्ये फॉलोअप साठी, डायलेसिस साठी, किमोथेरपी साठी नेणे.**

३. **एकट्या राहणाऱ्या जेष्ठांना मायनर ऑपरेशन साठी नेणे.**

४. एकट्या राहणाऱ्या जेष्ठांशी गप्पा मारणे, फिरायला नेणे, रेल्वे स्टेशन वर गाडीत बसवून देणे, उतरवून घेणे हे ही केले जाते.
५. दिनानाथ, सहयाद्री, पुना, संजीवन, शाश्वत, इत्यादी हॉस्पिटल्स मध्ये आणि घरी ३००० तास सेवा दिली गेली.
६. पुण्यात १०० आणि मुंबईत ४० स्वयंसेवकांचे पथक सेवे साठी सज्ज.





"सोबती" सेवा देणाऱ्या स्वयंसेवकांना प्रवास खर्च अधिक काही मानधन देण्याची व्यवस्था करण्याचे योजले आहे.

प्रवास खर्च रुपये २०० + मानधन २०० प्रती दिवस

| | |
|---|---|
| मानधन | ४०० |
| व्यक्ती | ३० अंदाजे १२००० प्रती व्यक्ती |
| महिना खर्च | ३६००० |
| वर्षाचा खर्च | ४३२००० |
| एडमिनिस्ट्रेशन खर्च | १०००० |
| एकूण वार्षिक खर्च | ४४२००० |

या सेवे व्यतिरिक्त अनेक सामाजिक उपक्रम **BeingwithYou Help Foundation** द्वारे राबविले जातात.

"क्षुधा शांती" मध्यान्ह भोजन

सरकारी किंवा धर्मदाय हॉस्पिटल्स मध्ये अल्प उत्पन्न असलेले रुग्ण दाखल होत असतात सरकारी हॉस्पिटल्स मध्ये बऱ्याच सेवा मोफत असतात परंतु काही सेवां साठी शुल्क घेतले जाते. त्यामुळे बरेचदा रुग्णाचे जवळचे नातेवाईक अर्धपोटी किंवा उपाशी राहतात. रुग्णाची काळजी घेणाऱ्यांची तब्बेत नीट असेल तर ते चांगली काळजे घेऊ शकतील, हे लक्षात घेऊन रुग्ण आणि त्याच्या जवळच्या नतेवाईकां साठी **"क्षुधा शांती"** हा मध्यान्ह भोजन उपक्रम आम्ही घेत आहोत. पुण्यात के. ई. एम. हॉस्पिटल, रास्ता पेठ, पुणे तसेच नवले हॉस्पिटल, पुणे येथे आणि मुंबईत स. का. पाटील हॉस्पिटल, मालाड, मुंबई येथे हा उपक्रम सुरू आहे. के. ई. एम. येथे आणि नवले हॉस्पिटल येथे सध्या  आढवड्यातून चार दिवस फ्री डबे दिले जात आहेत. मागणी रोजची आहे पण मिळालेल्या देणगी मधून सध्या एवढेच शक्य होते आहे. मुंबई मध्ये टि. बी. च्या रुग्णांना डॉक्टरांच्या सल्या ने एका महिन्याचे रेशन फ्री दिले जाते. दर महिन्याला आठ ते दहा जणांना दिले जाते. या सगळ्यांची निवड हॉस्पिटलच्या **MSW** डिपार्टमेंट कडून केली जाते आणि आमचे स्वयंसेवक वाटप साठी जातात.





**पुढिल वर्षाचे नियोजन**

**१ दिवस ७५ डबे १२० प्रती डबा ९०००**

**१ अठवडा ७५× ७ = ५२५ डबे × १२० = ६३०००**

**१ महिना ५२५ × ४ = २१०० × १२० = २५२०००**

**१ वर्ष २१०० × १२= २५२०० × १२० = ३०२४०००**

**"जन औषधी"**

सरकारी किंवा धर्मदाय हॉस्पिटल्स मध्ये अल्प उत्पन्न असलेले रुग्ण दाखल होत असतात सरकारी हॉस्पिटल्स मध्ये बऱ्याच सेवा मोफत असतात परंतु काही सेवां साठी शुल्क घेतले जाते, तसेच सरकारी हॉस्पिटल्स मध्ये बरेचदा अज्ञात रुग्ण देखील दाखल होत असतात अशा रुग्णांच्या औषधोपचाराचा खर्च कोणी करायचा हा प्रश्न असतो. अशा वेळी त्यांना लागणारी काही औषधे फ्री मिळाली तरी प्रशासना वरचा भार थोडा हलका होतो. तसेच गरीब रुग्णांनाही फ्री औषधे मिळाली तर त्यांना मदत होते. हे लक्षात घेऊन **"जन औषधी"** हा उपक्रम राबवला जात आहे. हॉस्पिटलशी सलग्न असलेल्या "जन औषधी केंद्रात" किंवा मेडिकल स्टोर मध्ये दार महिना ठराविक रक्कम भरली जाते त्यातून रुग्णांना फ्री औषधे दिली जातात. हा उपक्रम ही पुण्यात के. ई. एम. हॉस्पिटल, रास्ता पेठ, पुणे, नवले हॉस्पिटल पुणे येथे आणि मुंबईत स. का. पाटील हॉस्पिटल, मालाड, आणि शताब्दी रुग्णालय कान्दीवली मुंबई येथे हा उपक्रम सुरू आहे. दोन्ही हॉस्पिटल मधे रुपये ३०००० इतका निधी देण्यात येत आहे.






या निधीत वाढ करून औषोधोपचारा बरोबरच ज्या पेशंटना बोन मॅरो ट्रान्सप्लांट, किडनी ट्रान्सप्लांट, लिव्हर ट्रान्सप्लांट, हृदयाच्या शस्त्रक्रिया यांसारख्या खर्चिक शस्त्रक्रियां साठीही काही निधी उपलब्ध करता आलातर पहायचे आहे किमान १० पेशंटना वर्षषभरात २५ हजारा पर्यंत निधी उपलब्ध करणे तसेच ३० हजाराचा ५० हजार प्रती महिना असा

**१० पेशंट × २५००० = २,५०,०००**

**५०००० × १२ = ६,००,०००**

**एकुण ७,५०,०००**

**"आरोग्य शिबीर"**

BeingWithYouHelp Foundation च्या द्वारा आम्ही सरकारी शाळा, अनुदानित शाळा किंवा समाजाद्वारे चालविल्या जाणाऱ्या शाळांची निवड करून तिथे विद्यार्थ्यां साठी मोफत "आरोग्य व दंत चिकित्सा शिबिराचे" आयोजन केले जाते.

या आरोग्य तपासणी शिबिरांदरम्यान, आमची टीम कोणत्याही संभाव्य आरोग्य समस्या ओळखण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांची कसून तपासणी करते. निदान झाल्यास, आम्ही पुढील मूल्यांकन आणि उपचारांसाठी स्थानिक रुग्णालये किंवा दवाखान्यांना संदर्भ देतो.

आरोग्य तपासणी व्यतिरिक्त, आम्ही सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत आरोग्य आणि स्वच्छता उत्पादने असलेले किट देखील प्रदान करतो. आमचा विश्वास आहे की संपूर्ण आरोग्य आणि कल्याण राखण्यासाठी चांगल्या स्वच्छता पद्धतींचा प्रचार करणे आवश्यक आहे.

आमच्या आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून, आम्ही विद्यार्थ्यांमधील आरोग्यविषयक समस्या ओळखण्यात यशस्वी झालो आहोत. यामध्ये किडनी, फुफ्फुसे, हृदय, डोळे, दातांच्या समस्या आणि एपिलेप्सीची लवकर ओळख होण्याशी संबंधित समस्यांचा समावेश होतो. या समस्या लवकरात लवकर शोधून, विद्यार्थ्यांना त्यांचे आरोग्य प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यासाठी आवश्यक वैद्यकीय उपचार मिळेल याची खात्री करण्यात आम्ही मदत करू शकतो.

आम्ही आरोग्य शिबिरे आयोजित करण्यासाठी आणि गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक सहाय्य प्रदान करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू ठेवण्यासाठी वचनबद्ध आहोत. सर्व विद्यार्थ्यांसाठी त्यांची पार्श्वभूमी किंवा परिस्थिती काहीही असो, त्यांच्यासाठी निरोगी आणि पोषक वातावरणाचा प्रचार करणे हे आमचे ध्येय आहे. आमचा विश्वास आहे की आरोग्यविषयक समस्यांचे लवकर निराकरण करून आणि चांगल्या स्वच्छता पद्धतींना प्रोत्साहन देऊन, आम्ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी योगदान देऊ शकतो आणि त्यांना त्यांच्या शैक्षणिक कार्यात भरभराट होण्यासाठी सक्षम करू शकतो.

BeingWithYouHelp Foundation, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाचे महत्त्व ओळखते. निरोगी असणे हे मुलांच्या बौध्दीक आणि शारीरीक विकासासाठी महत्वाचे आहे आणि हेच लक्षात घेऊनच शिबिरांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांच्या आरोग्य पुर्ण विकासा साठी प्रयत्न करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.
आरोग्य शिबिर खर्च अंदाजे

**पुण्यात शिबीर असेल तेंव्हा**

एक दिवस ८ डॉक्टर्स ×८००० = ६४०००
प्रवास खर्च पुण्यात =६०००
व्हॉलेंटियर्स १० + ८ डॉक्टर जेवण चहा नाष्टा = ६३००
कॉन्सिलेशन गिफ्ट विद्यार्थ्यांसाठी ६०० × २०० = १२००००
एकूण खर्च = १,४८,३००

**पुण्या बाहेरील शिबीरांना येणारा खर्च ( विद्यार्थ्यांच्या संख्ये नुसार किती दिवस शिबीर किती दिवस घ्यायचे ते ठरते )**

**पुण्या बाहेरील शिबीरांना येणारा खर्च**

एक दिवसाचे शिबीर
एक दिवस ८ डॉक्टर्स ×८००० = ६४०००
प्रवास खर्च पुणे ते शिबीरचे ठिकण =१८००० अंदाजे
व्हॉलेंटियर्स १० + ८ डॉक्टर जेवण चहा नाष्टा = ८०००
कॉन्सिलेशन गिफ्ट विद्यार्थ्यांसाठी ६०० × २०० = १२००००
एकूण खर्च = २१००००

शिबीरच्या दिवसां प्रमाणे खर्चात वाढ होईल,

(सर्व खर्च अंदाजे आहेत)




## जागतिक महिला दिना

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च २०२३ रोजी अलंकार पोलिस चौकी येथे महिला पोलिसांसाठी मोफत रक्त तपासणी शिबीर घेण्यात आले. या पुढेही दार वर्षी घेण्याचे योजले आहे.













**रक्तदान शिबिर**

**२०२१ मध्ये** जानेवारी आणि डिसेंबर महिन्यात रक्तदान शिबिरांचे आयोजन करून अनुक्रमे ४५ आणि ३९ बॅगा रक्त संकलन करण्यात आले होते. तसेच रुग्णांच्या अवश्यकते नुसार ही वॉलंटियर द्वारा रक्त दान केले जाते.









## **“आप्त निवास”**

बाहेरगावाहून विविध उपचारां साठी पुण्या मुंबई सारख्या शहरांमध्ये येत असतात ट्रान्सप्लांट, ओपेन हार्ट, किमो थेरपी सारख्या आजारा वरची ट्रीटमेंट बरेच दिवस चालते अशावेळी रुग्ण आणि त्याच्या जवळच्या नातेवाईकांना बरेच दिवस शहरात राहावे लागते. लॉजवर हॉटेलवर राहणे काहीना परवडण्या सारखे नसते नातेवाईकांकडे राहणेही सोईचे वाटत नाही. त्यांची फार कुचंबणा होते. अशा वेळी जर अल्प दरात त्यांची राहण्याची सोय व्हावी या उद्देशाने **“आप्त निवास”** चा संकल्प सोडला आहे, त्यासाठी पुण्यात मध्यवर्ती ठिकाणी जागा शोधून त्या जागे साठी निधी उभारण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.



## **“प्रथमोचर शिबीर”**

अपघात कुठेही घडू शकतात अशावेळी अपघातग्रस्त व्यक्तिला वेळेवर मदत मिळावी आणि तिचे प्राण वाचावे यासाठी शास्त्र शुद्ध प्रशिक्षणाची आवश्यकता लक्षात घेऊन **BeingwithYou Help Foundation** “**प्रथमोचार प्रशिक्षण कार्य शाळांचे”** आयोजन करते.

मुंबई आणि पुण्यात **“प्रथमोचार शिबिरे”** घेऊन नागरिकांना प्रथमोचरचे प्रशिक्षण तज्ञ डॉक्टर मंदार अककलोटकर यांच्या द्वारा दिले जाते. प्रथमोचार पेटी कशी असावी त्यात आधुनिक कोणती साधने असावीत याची माहिती दिली जाते. तसेच परेलिसिस, हार्ट एटेक, कसा ओळखावा, गरज भासल्यास CPR कसा द्यावा याचे प्रशिक्षण दिले जाते.

रास्ते अपघातात किंवा घरातील अपघातात  रुग्णाला वैद्यकीय मदत मिळे पर्यन्त कशी मदत करावी. 108 ॲम्ब्युलेन्स ला कसे बोलवावे हेही शिकवले जाते. तसेच रुग्णाला मदत करत असताना स्व:ताला कसे सुरक्षित ठेवावे याचे ही प्रशिक्षण दिले जाते.









**BeingwithYou Help Foundation**इतर अनेक उपक्रम घेतले गेले आहेत. जे पुढेही घेण्यात येणार आहेत. त्या विषयी थोडक्यात माहिती.



**२०२०** हे वर्ष संपूर्ण जगावर संकटाचे सावंट घेऊन आले होते. करोंना महामारीच्या काळातही **BeingwithYou Help Foundation** च्या ३ तासाची सेवा वगळता इतर सेवा अखंड सुरू होत्या. घरात एकट्या पडलेल्या जेष्ठांना त्यांच्या जवळच्या नतेवाईकांकडे सुखरूप पोहचविणे, प्रवासी मजूराना अन्न दान, करोंना बाधित रुग्णांना घरी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण, हॉस्पिटल मध्ये बेड मिळण्यासाठी मदत कारण, “प्लाजमा थेरपी” म्हणजे काय प्लॅजमा म्हणजे काय या बद्दल जन जागृती करून ५० रुग्णांना प्लॅजमा मिळवून दिल, कोविड लसीकरण केंद्रा वर जेष्ठांना नेणे जवळच्या केंद्राची  माहिती देणे या सारखी अनेक कामे मी स्वतः माझ्या पतीच्या सहकार्याने केली.





- **प्लाज्मा दान करणारीकाही मंडळी**



# **“नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन”**

**BeingwithYou Help Foundation** २०२० साली **“निसर्ग वादळाचे”** संकट कोकणावर कोसळे होते. या वादळचा फटका किनारपट्टीच्या गावांना अधिक बसला होता. करोंना मुळे लॉक डाऊन होता जिल्हा बंदी होती. त्यामुळे कोकणातील लांबच्या गावां पर्यन्त मदत पोहचली नव्हती. त्यावेळी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील हर्णे, मुरुड, पाळंदे, आंजर्ले या गावातील ३०० कुटुंबाना मदत पोहचविण्यात आली.







२०२१ हे वर्ष देखील कोकणावर आपत्ती घेऊनच आले. चिपळूण व महाड येथे आलेल्या पुरामुळे लोकांचे सर्वस्व वाहून गेले होते. यावेळी अनेक सामाजिक संस्थानी मदत केली होती. **BeingwithYou Help Foundation** तर्फे लोकसहभागातून अन्न धान्ये, औषधे, पिण्याचे पाणी, कपडे, चादरी सतरंज्या, सानेटरी पॅड, भांडी असे जवळजवळ ४.५ टन साहित्याचे वाटप दोन्ही ठिकाणी करण्यात आले. गरजे नुसार आपत्ती व्यवस्थापनाचे काम केले जाते.














BeingWithYouHelp Foundation चे Hand of Empathy Love and Protection हे ब्रीद वाक्य आहे त्याला अनसरूनच फाउंडेशनची वाटचाल सुरु आहे. अधिक माहिती साठी संपर्क : 7276797124 www.bwithyou.org या आमच्या वेब साईटला भेट द्या

*आपले आर्थिक सहकार्य वरील उपक्रमां मधे सातत्य राखण्यास मदत करणार आहे. आपला मदतीचा हात गरीब रुग्णांच्या नातेवाईकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवेल*

*देणगीदारांना सेक्शन 80G अंतर्गत करसवलत मिळेल*

*CSR करणाऱ्या कंपन्यांना लागणारे सर्व डॉक्युमेंटस् तयार आहेत. आरोग्य शिबिर, क्षुधा शांती, आणि जन औषधी या प्रोजेक्ट साठी निधीची आवश्यकता आहे. किंवा तुमचे काही आरोग्य विषयक उपक्रम असतिल तर त्यातही आम्ही मदत करू*